# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२      पेपर कात्रण      दिनांक :- १२/१२/२०२२

-----------------oooooo------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेराः-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेराः-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेराः-

CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- १२/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

२)


| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १२/१२/२०२२ | सकाळ पान क्र. ४ | विरार विनयभंग प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग | मांडवी | |
| २. | १२/१२/२०२२ | लोकमत पान क्र. ३ | श्रद्धा हत्याकांडप्रकरणी पोलिसांवर कारवाई ? | तुळींज/ माणिकपुर | |
| ३. | १२/१२/२०२२ | लोकमत पु. पान क्र. १ | मीरा भाईंदरमध्ये नशेखोरीला जोर | मीरा भाईंदर | |
| ४. | १२/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. ३ | बालमजूर ठेवणाऱ्याला अटक | नवघर | |
| ५. | १२/१२/२०२२ | लोकमत पु. पान क्र. १ | भाईंदरला मनमानी शेअर रिक्षा भाडेवाढ | मीरा भाईंदर | |
| ६. | १२/१२/२०२२ | म.टा. पु. पान क्र. १ | पोलीस अधिकारीही धावले | वसई विरार | |
| ७. | १२/१२/२०२२ | लोकमत पु. पान क्र. ४ | ते पोलीस तुम्हालाही भेटले का ? | इतर | |
| ८. | १२/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. १ | ड्रग्स खरेदीसाठी डार्क वेबचा वापर | इतर | |

CamScanner

१) सकाळ पान क्र. ४ दि. 12/12/2022

# विरार विनयभंग प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग

नालासोपारा, ता. ११ (बातमीदार) : धावत्या कारमध्ये २१ वर्षीय महिलेचा विनयभंग करून तिच्या १० महिन्यांच्या बाळाला कारमधून फेकल्यामुळे बाळाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली होती. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्त सदानंद दाते यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत महिलेच्या जबाबावरून मांडवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात ज्या कारमध्ये घटना घडली होती, ती कार जप्त करून, आरोपी कारचालकाला अटक करण्यात आली आहे. आज सकाळी पोलिस आयुक्त सदानंद दाते यांनी घटनास्थळाला भेट देत गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग केला आहे.



नालासोपारा : घटनास्थळावर पाहणी करताना पोलिस अधिकारी.

तसेच या गुन्ह्याचा तपास वेगवान आणि चोख करण्यासाठी मी स्वतः कटिबद्ध असेन, असे आश्वासनही सदानंद दाते यांनी दिले आहे.

शनिवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास गुजरात पासिंग असणाऱ्या इको कारमधील चालक आणि कारमधील अन्य ३ जणांनी महिलेचा विनयभंग करून, तिच्या १० महिन्यांच्या बाळाला धावत्या कारमधून फेकून दिले, या वेळी मुलीला वाचवण्यासाठी महिलेनेही कारमधून उडी मारली. यात मुलीचा मृत्यू झाला; तर महिला जखमी झाली.

घटना अत्यंत संवेदनशील आणि गंभीर स्वरूपाची असल्याने आम्ही तात्काळ हत्या आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास पारदर्शक आणि उत्तम पद्धतीने व्हावा, यासाठी हा तपास गुन्हे शाखा करणार आहे. यावर स्वतः गुन्हे पोलिस उपायुक्त आणि मी स्वतः लक्ष ठेवणार आहे.

- सदानंद दाते, पोलिस आयुक्त.

## ठाकरे गट आक्रमक

विरार : या प्रकाराची दखल घेत शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडी पालघर पोलिस प्रशासनाची भेट घेऊन गुन्हेगारावर कठोर कारवाईची मागणी केली.

२) लोकमत पान क्र. ३

# श्रद्धा हत्याकांडप्रकरणी पोलिसांवर कारवाई?

## तक्रारीनंतरही चौकशीत बेजबाबदारपणा दाखविल्याचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिसांनी वेळीच कारवाई केली असती तर माझी मुलगी वाचली असती, असा आरोप श्रद्धा वालकरचे वडील विकास यांनी पत्रकार परिषद घेऊन केल्यानंतर तपासात आणि चौकशीत बेजबाबदारपणा दाखवत दिरंगाई करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले आहेत. त्यामुळे तुळींज आणि माणिकपूर ठाण्यातील तत्कालीन पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

श्रद्धाने तक्रार देऊनही त्याची दखल न घेतल्याबद्दल तिच्या वडिलांनी पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केल्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशीबाबत आदेश काढल्याचे सूत्रांकडून कळते. आफताब माझा गळा दाबून मला ठार करेल, अशी तक्रार श्रद्धाने पोलिस ठाण्यात केली होती. मात्र त्याची वेळीच दखल घेतली गेली नाही.




आरोपी आफताब पुनावाला याने मारहाण केल्यानंतर श्रद्धाने तुळींज आणि माणिकपूर पोलिस ठाण्यात धाव घेतली होती; परंतु, पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. श्रद्धाशी तेव्हाच नीट संवाद साधून तिला बोलते केले असते, आफताबला पोलिस ठाण्यात बोलावून समज दिली असती तरी त्याच्या कृत्याला आळा बसला असता, अशी तिच्या कुटुंबीयांची भावना आहे. हा मुद्दा श्रद्धाचे वडील विकास यांनी पोलिसांच्या चौकशीवर प्रश्न उपस्थित केले. तत्कालीन पोलिस अधिकाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे.

### तक्रारच मागे घेतली, तर मग पोलिस दोषी कसे?

- श्रद्धाने जेव्हा तुळींज पोलिस ठाण्यात मारहाणीची तक्रार केली होती. त्यावेळी तिला वैद्यकीय तपासणी करून येण्यास सांगितले; पण ती आलीच नाही. तिला अनेक वेळा तुळींज पोलिसांनी चौकशीसाठी बोलावल्यावर ती आली.
- पण त्यावेळी तिने आफताबबाबत काहीही तक्रार नसल्याचा जबाब पोलिसांना दिला आहे. मूळ तक्रारच मागे घेतल्याने पोलिसांना तपास करता आला नाही. तिच्या वडिलांनी पोलिसांवर केलेल्या आरोपात तथ्य नाही.
- त्यावेळी पोलिसांनी योग्य चौकशी आणि तपास केल्याचे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर 'लोकमत'ला सांगितले.

CamScanner

दि. 12/12/2022

3) लोकमत पृ. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरमध्ये नशेखोरीला जोर

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये गल्लीबोळांत गांजा, एमडीसारखे अमली पदार्थ, गुटखा, सुगंधी तंबाखूजन्य पदार्थ सहज मिळत आहेत. अमली पदार्थ, गुटखा आदी बंदी असलेल्या व घातक वस्तूंची तस्करी बिनबोभाट सुरू आहे. अमली पदार्थांचे सेवन करताना सर्रास तरुण आढळतात. लोकांना उघडपणे अमली पदार्थ व गुटख्याची विक्री करताना दिसतात. अमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे लक्षात येते. मनुष्यबळ नसलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या इच्छाशक्तीचे बळही कमी पडत आहे.



## 'विक्रेत्यांचे परवाने रद्द करावेत'

विक्रेत्यांवर सातत्याने गुन्हे दाखल करण्यासह अन्य तत्सम कारवाई करणे, त्यांचे परवाने रद्द करणे आदींची गरज आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरात दोन-तीनच निरीक्षकच असल्याने अन्न व औषध प्रशासनाकडून सातत्याने कारवाई होत नसल्याचे दिसत आहे.

पोलिसांनी अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवर अनेक गुन्हेही दाखल केले आहेत. त्याचप्रमाणे अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्यांनाही पकडल्याचे गुन्हे आहेत. तरीही अमली पदार्थांची तस्करी व विक्री सुरूच आहे. मध्यंतरी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या एका पोलिसालाच अन्य राज्यातून अमली पदार्थांची तस्करी करताना पकडले होते. खुद्द पोलिसच अमली पदार्थांची तस्करी करीत असतील, तर असे आणखी किती जणांचे लागेबांधे या अमली पदार्थांच्या तस्करीत आहेत, हेही शोधले पाहिजे.

अमली पदार्थांसह गुटखा-सुगंधी तंबाखू यांच्यावर बंदी असूनही ते सर्रास अनेक पानटपरी, किराणा दुकान आदी ठिकाणी मिळत आहेत

4) पुढारी पृ. पान क्र. 3

# बालमजूर ठेवणाऱ्याला अटक

## भाईंदरमध्ये तीन मुलांची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या पारस इंटरप्राईजेस या कंपनीचा मालक बाल मजुरांकडून काम करून घेत होता. त्याला अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी अटक केली आहे. कंपनीत काम करणाऱ्या तीन बाल मजुरांची सुटका केली आहे.



अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना गाळा नं ०८ व्ही, पारस इंटरप्राईजेस, उद्योग इंट्रस्ट्रीयल इस्टेट, मच्छी मार्केट जवळ, भाईंदर पूर्व या ठिकाणी अल्पवयीन मुलांकडुन काम करून घेत आहे अशी माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोनि. समीर अहिराव यांनी त्या ठिकाणी पोलीस पथकासह छापा टाकला. ३ अल्पवयीन मुले स्टीलच्या कंपनीत इलेक्ट्रीक लोखंडी भट्टी मशीनवर अनधिकृतपणे कामावर ठेवून त्यांच्याकडून सक्तीने बेकायदेशीर , धोकादायक तसेच जिवीतास धोका होईल,. असे काम करुन करत असताना मिळून आल्याने त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिने ताब्यात घेण्यात आले. कंपनीचा मॅनेजर किसनकुमार यमुनाशंकर यादव (वय ५०) यास ताब्यात घेवुन मॅनेजर व मालक यांच्याविरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

5) लोकमत पु. पान क्र. 1

दि. 12/12/2022

# भाईंदरला मनमानी शेअर रिक्षा भाडेवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेस शेअर रिक्षाचे भाडे २ ते ५ रुपयांनी वाढविले आहे. भाडेवाढीस प्रादेशिक परिवहन विभागाची मान्यता नसल्याने भाडेवाढ वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.

रिक्षाचालक मालक असोसिएशनने दरवाढीचे फलक लावून रिक्षा शेअरभाडे वाढवले आहे. भाईंदर रेल्वे स्थानक ते भाईंदर पोलीस ठाणे व भाईंदर फाटकापर्यंत १० रुपये शेअर भाडे होते. आता फाटकापर्यंत १५ रुपये भाडे केले आहेत. तर इंदिरा कॉम्प्लेक्स व पोलीस ठाण्यापर्यंत १२ रुपये भाडे केले आहे. भाईंदर स्टेशन ते ९० फुटी मार्गपर्यंत १३ रुपये होते. हे दर आता १५ रुपये झाले आहेत.

भाईंदर फाटक ते पोलीस ठाणे १० रुपये असलेले भाडे १२ रुपये केले आहे. जैन मंदिर ते मॅक्सस मॉल १० चे १२ रुपये केले आहे. स्टेशनपासून मॅक्स मॉल व मुबारक कॉम्प्लेक्सपर्यंतचे १५ रुपये तर डीमार्टपर्यंत २० रुपये भाडे कायम ठेवले आहे. संघटनेने सीएनजी, देखभाल दुरुस्तीचा वाढलेला खर्च यामुळे दरवाढ केल्याचे म्हटले आहे.

6) म.टा. पु. पान क्र. 1



# पोलिस, अधिकारीही धावले

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई-विरार महापालिकेच्या १०व्या मॅरेथॉन स्पर्धेत रविवारी अनेक सरकारी, पालिका कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी, कर्मचारी, रेल्वे कर्मचारी आणि ब्लॅक कॅट कमांडोदेखील सहभागी झाले. विशेष म्हणजे, या स्पर्धेत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक यांनीही हजेरी लावली.

पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. उत्तम आरोग्यासाठी शारीरिक तंदुरुस्ती महत्वाची आहे आणि हा संदेश यंदाच्या मॅरेथॉनमधून दिल्याचे त्यांनी म्हटले. पालिकेचे अभियंता सुरेंद्र ठाकरे आणि प्रदीप पाचंगे यांनी २१ किलोमीटर स्पर्धेत सहभाग नोंदवला. पो.निरीक्षक सुरेश वराडे, पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख या अधिकाऱ्यांसह अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनीदेखील दौड पूर्ण केली.

स्पर्धेत लहान मुलांपासून ते ८० वर्षांच्या आजोबांपर्यंत स्पर्धकांचा समावेश होता. वसईतील यशवंत कुलकर्णी यांनी पायात ३.७० किलोचा रॉड असतानाही धाव घेतली, तर त्यांच्या पत्नी प्रतिभा कुलकर्णी यांनी कॅन्सरग्रस्त असताना आणि २० केमोथेरपी घेतल्या असतानाही मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन इतरांना प्रेरणा दिली.

**जिद्दीचे बळ**

एका पायाने विकलांग असलेले प्रदीप कुंभार यांनी ११ किमीच्या स्पर्धेत छाप पाडली. 'जिद्द असेल, तर कसेही करून संकटावर मात करता येते, धावण्याची इच्छा मी या स्थितीतही पूर्ण केल्याचा आनंद आहे. निराश न होता संकटावर मात करायला शिका,' असा संदेश प्रदीप यांनी दिला.

**कलाकारांची उपस्थिती**

मॅरेथॉन स्पर्धेतील स्पर्धेतील स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी हास्यजत्रा मालिकेचे कलाकार सकाळपासून हजर होते. समीर चौगुले, अरुण कदम, रसिक वेंगुर्लेकर, जयंत वाडकर, पुष्कर श्रोत्री, नागेश भोसले, गणेश यादव, तुषार दळवी, भूषण पाटील, राहुल रानडे यांनी स्पर्धकांचा उत्साह वाढवला.

CamScanner

> लोकमत पु. पान क्र. 4

दि. 12/12/2022



लोकमत

# 'ते' पोलिस तुम्हालाही भेटले का ?...

'पुढे चोरी झाली आहे... हत्या झाली आहे... नाकाबंदी सुरू आहे...आणि तुम्ही दागिने घालून फिरताय? आधी दागिने सांभाळा' असा दम देत दागिने काढून ठेवण्याचा सल्ला देणारे तोतया पोलिस वाटेत भेटल्यास वेळीच सावध होणे गरजेचे आहे. गेल्या काही दिवसांत पोलिस असल्याची बतावणी करत नागरिकांचा किमती ऐवज घेऊन पसार होण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे अशा तोतया पोलिसांचा वाढता वावर चिंतेचा विषय ठरत आहे.

## ताजा विषय

मनीषा म्हात्रे



अँटॉप हिल परिसरात राहणारे राक्सविन अँथनी फर्नांडिस (७६) हे सकाळी माटुंगा येथील नाथालाल पारेख मार्गावरून सायकलने जात असताना दोन अनोळखी इसमांनी ते पोलिस असल्याची बतावणी करून थांबवले. तसेच, रोडवर बऱ्याच चोऱ्या होत असल्याचे सांगून दागिने रुमालात बांधून ठेवण्यास सांगितले. त्यांनीही विश्वास ठेवून दागिने काढले. दागिने रुमालात बांधून ठेवण्याच्या नावाखाली त्यात बनावट सोनसाखळी ठेवून ठग मंडळी निघून गेली. काही अंतरावर गेल्यानंतर रुमालात सोनसाखळी नसल्याचे लक्षात येताच त्यांना धक्का बसला. त्यांनी तत्काळ पोलिसांत धाव घेत तक्रार दिली.

अशाच प्रकारे अनेक जण या तोतया पोलिसांच्या जाळ्यात अडकत आहेत. दिवसाआड अशाप्रकारे फसवणुकीची घटना समोर येत आहे. त्यामुळे असे तोतया पोलिस भेटल्यास वेळीच सतर्क होणे गरजेचे आहे. ही मंडळी बोलण्यात गुंतवून हाती नकली दागिने तसेच दगड ठेवून पसार होतात.

### नाकाबंदीचा बहाणा

भायखळा परिसरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या गृहिणीला अडवून एकाने पोलिस असल्याची बतावणी करून थांबवले. "मैं पुलीसवाला हु.. हिफाजत के लिए खड़ा हु...'सांगत स्वतःचे ओळखपत्र दाखविले. तसेच, नाकाबंदी सुरू असल्याने दागिने काढून ठेवण्याचा सांगितले. जवळील पेपरमध्ये महिलेचे दागिने ठेवण्याच्या बहाणा करत तो निघून गेला. महिलेने पेपर उघडून बघताच त्यात नकली चेन मिळून आली.

### ज्येष्ठ नागरिक सॉफ्ट टार्गेट

मॉर्निंग वॉक, देवदर्शन किंवा जेवणानंतर शतपावलीसाठी बाहेर पडणारे ज्येष्ठ नागरिक या तोतया पोलिसांसाठी सॉफ्ट टार्गेट ठरताना दिसते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी विशेष खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे आवाहन वेळोवेळी पोलिसांकडून करण्यात येत आहे.



### थेट लूट




द्रुतगती महामार्गावर ही मंडळी पोलिस असल्याची बतावणी करत थेट लूट करत असल्याच्या घटनाही गेल्या काही दिवसांत डोके वर काढताना दिसत आहे. वाहन थांबवून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती घालून पैसे लाटत असल्याचेही दिसून येत आहे.

### रेड आणि बरंच काही...

अनेकदा विविध व्यवहारांदरम्यान खोटी रेड पडल्याचे सांगून ठग मंडळी पैशांसह पसार होतात. यावेळी विशेषतः व्यापाऱ्यांनी काळजी घेणे गरजेचे आहे.



CamScanner

४) पुढारी पृ. पान क्र. १

दि. 12/12/2023

# ड्रग्ज खरेदीसाठी डार्क वेबचा वापर

## दर मिनिटाला क्रिप्टो करंन्सीमधून होतात लाखो डॉलरचे व्यवहार

**ठाणे : नरेंद्र राठोड**

**ड्रग्ज माफियांवर पोलिसांनी व नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोने कारवाई तीव्र केल्यामुळे मुंबई-ठाणे परिसरातील ड्रग्जचा बाजार बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आला आहे. ड्रग्जच्या बाजारावर तपास यंत्रणांनी करडी नजर रोवल्याने यातून मार्ग काढण्यासाठी नशेडींनी आपली तलफ भागवण्यासाठी अनेक पर्यायी पदार्थांचा वापर सुरू केला आहे. तर ड्रग्ज माफियांनी देखील ऑफलाईन मार्केटमध्ये रिस्क वाढल्याने ऑनलाइन ड्रग्ज स्मगलिंगचा पर्याय शोधून काढला आहे. त्यासाठी डार्क वेब अथवा डार्क नेट नामक इंटरनेटच्या गुप्त दुनियेचा वापर केला जातोय. डार्क वेबच्या माध्यमातून अनेक देशातून भारतात ड्रग्ज स्मगलिंग केली जातेय. सध्या विदेशातून भारतातल्या मुंबईसह सर्वच प्रमुख शहरांमध्ये पोहचणाऱ्या ८० टक्के ड्रग्ज कन्साइन्मेंट याच डार्क वेबच्या माध्यमातून ऑर्डर केल्या जातात. डार्क वेबच्या माध्यमातून होणाऱ्या या स्मगलिंगच्या धंद्यात बिटकॉईन व क्रिप्टो करेंसीने आर्थिक व्यवहार केला जातोय.**

नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोने नुकतेच मुंबई व दिल्ली येथून पकडलेल्या कोकेन व हिरॉईन ड्रग्ज प्रकरणात डार्क वेबचे कनेक्शन समोर आले आहेत. मुंबई, दिल्ली, कलकत्ता, बंगळुरू या बड्या शहरांसह अनेक ठिकाणी पोहचवण्यात येणारे घातक ड्रग्ज डार्क वेबच्या माध्यमातून विदेशातून भारतात मागवले जातात. त्यानंतर या ड्रग्ज कन्साइन्मेंटला समुद्रमार्गे विविध शहरात पोहचवले जाते अशी बाब तपास यंत्रणांच्या चौकशीतून पुढे आली आहे. डार्क वेबचे लोण बडे ड्रग्ज माफियांपर्यंतच शिल्लक राहिलेले नाही, तर अनेक नशेडी व छोटेमोठे तस्कर देखील डार्क वेबच्या माध्यमातून ड्रग्ज कन्साइन्मेंट ऑनलाइन ऑर्डर करीत असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. काही महिन्यांपूर्वी ठाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाने कल्याण-डोंबिवलीतल्या तिघा ड्रग पेडलरकडून पेपर बॉम्ब अर्थात एलएसडी पेपर हे डिझायनर ड्रग्स पकडल्याने एकच खळबळ उडाली होती. या कारवाईत तब्बल १ हजार ४६६ एलएसडी पेपर जप्त करण्यात आले होते. त्यांची किंमत तब्बल १ कोटी २ लाख ६२ हजार रुपये इतकी आहे. या गुन्ह्यात अटक केलेल्या तिघा तरुणांनी हे ड्रग्ज डार्क वेबच्या माध्यमातून ऑनलाइन मागवल्याचे समोर आले आहे. या घटनेतून ड्रग्ज माफिया आपला व्यवसाय ऑनलाइन करण्यासाठी डार्क वेबचा वापर करीत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नेमके



हे डार्क वेब आहे तरी काय? असा प्रश्न अनेकांसमोर उपस्थित झाला आहे. डार्क वेब म्हणजे इंटरनेटवरील तस्करी जगताचे स्वतःचे छुपे ब्राऊजर आहे. येथे घातक हत्यार, लोकांचे क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड डिटेल्स, ई-मेल, लोकांचे फोन नंबर, ड्रग्स, नकली करन्सी इतर वस्तू सहज मिळतात. या सर्व गोष्टी येथे खूप कमी दरात मिळतात. आपण ज्या इंटरनेटचा वापर करतो, ते खूप छोटे आहे. इंटरनेटच्या मोठ्या भागापर्यंत लोक पोहचली नाहीत. त्यालाच डार्क वेब म्हणतात, इंटरनेटची ही दुनिया लोकांसाठी अदृश्य आहे. येथे युजर्सची ओळख गुप्त राखली जाते. हॅकर्ससाठी डार्क वेब हा मोठा अड्डा आहे. येथे करोडो लोकांची पर्सनल माहिती डार्क वेबमध्ये फक्त तीन हजार पाचशे रुपयांत मिळते. यामध्ये आपल्या सोशल मीडिया अकाउंट्सचा पासवर्ड, बँक डिटेल्स आणि क्रेडिट कार्ड संबधित माहितींचा समावेश असतो. डार्क वेबच्या माध्यमातून ड्रग्स आणि घातक हत्यार सर्रास विक्री होतात. दरम्यान, भारतात ड्रग्ज माफियांवर पोलिस, नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो व इतर तपास यंत्रणांनी करडी नजर रोवल्याने आता हे ड्रग्ज माफिया डार्क वेबच्या माध्यमातून ड्रग्ज स्मगलिंग करीत आहेत. सध्या भारतात पोहचणारे ८० टक्के कोकेन, हेरॉईन, एलएसडी, एमडी असे विदेशी ड्रग्ज डार्क वेबच्या माध्यमातून ऑर्डर केले जातात अशी माहिती ठाणे गुन्हे शाखेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.



### काय आहे डार्क वेब?

अमेरिकेतील गुप्तचर यंत्रणांनी जगभरातील महत्वाची माहिती मिळवण्यासाठी व त्या माहितीच्या आदानप्रदानासाठी डार्क वेब नावाच्या गुप्त इंटरनेट जगाचा वापर सर्व प्रथम नव्वदच्या दशकात सुरू केला. पुढे या डार्क वेबचा वापर ड्रग्ज व घातक हत्यार स्मगलिंग, हॅकिंग, ह्युमन ट्रॅफिकिंग व इतर बेकायदेशीर कामांसाठी होऊ लागला. डार्क वेब हा एक इंटरनेटचा एक प्रकार आहे. मात्र, येथे कुणालाही प्रवेश करणे सहजासहजी शक्य होत नाही. इंटरनेटच्या या गुप्त जगाला डार्क वेब म्हणतात. डार्क वेबवर सहजासहजी कोणालाही प्रवेश करता येत नाही यासाठी एका विशिष्ट ब्राऊझरची गरज लागते. त्याला टॉर ब्राऊजर म्हणतात. टॉर ब्राउझरच्या सुरक्षेसाठी ओनियन राऊटिंग ही यंत्रणा असते. त्यातून डार्क वेब वापरणाऱ्याचा आयपी ड्रेस कोणालाही समजत नाही. डार्क वेब वरील सर्व वेबसाइटचे स्वतंत्र डोमेन नेम असते. या डार्कवेबवरील वेबसाईट हॅकही होत नाहीत. आजस्थितीत जगभरात वापरले जाणाऱ्या एकूण इंटरनेट पैकी तब्बल ९० टक्के इंटरनेट डीप वेब आणि डार्क वेब आहे. या इंटरनेटच्या गुप्त जगात ड्रग्ज व हत्यार तस्करी, मानवी तस्करी, हॅकिंग आणि अशा अनेक घातक गोष्टी सर्रास चालतात. इतकेच नव्हे तर हल्ली येथे लोकांचे क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड डिटेल्स, ई-मेल, लोकांचे फोन नंबर, नकली करन्सी, प्राणी अवयव, घातक विष व इतर अनेक बेकायदेशीर वस्तू सहज मिळतात.

### डार्क वेब वापरणाऱ्यांना पकडणे मुश्किल

डार्क वेब वापरणाऱ्यांना पकडणे जवळपास अशक्य असते. त्यास कारण म्हणजे डार्क वेबसाठी वापरण्यात येणारे टॉर हे ब्राउझर. टॉर ब्राउझरवर वापरकर्त्यांचा आयपी ऍड्रेस नेहमी बदलत असतो. तर येथे सुरक्षेसाठी ओनियन राऊटिंग ही यंत्रणा असते. त्यातून डार्क वेब वापरणाऱ्याचा आयपी ड्रेस कोणालाही समजत नाही. इतकेच नव्हे तर येथे होस्ट आणि युझर यांची देखील माहिती मिळत नाही. साहजिकच त्यामुळे येथे सर्रास बेकायदेशीर वस्तू खरेदी व विक्री केल्या जातात आणि त्यांना पकडणे तपास यंत्रणांना मुश्किल होऊन बसते.

### क्रिप्टो करन्सीमधून होतात लाखो डॉलरचे व्यवहार

डार्क वेबच्या जगातून खरेदी विक्री केल्या जाणाऱ्या वस्तूंचे आर्थिक व्यवहार क्रिप्टो करेंसीच्या माध्यमातून केले जातात. क्रिप्टो करेंसी ही एक डिजिटल करन्सी आहे. क्रिप्टो करेंसी म्हणजे गुप्त पैसा किंवा डिजिटल पैसा. क्रिप्टो करेंसी ऑनलाइन स्वरूपात एकीकडून दुसरीकडे पाठवता येते. विशेष म्हणजे क्रिप्टो करेंसीवर कोणत्याही देशाच्या सरकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे डार्क वेबच्या जगात ड्रग्ज, हत्यार, हॅकिंग सॉफ्टवेअर, ह्युमन ट्रॅफिकिंग व इतर अनेक बेकायदेशीर गोष्टी खरेदी विक्रीसाठी क्रिप्टो करेंसीचा वापर केला जातो. डार्क वेबवर क्रिप्टो करेंसीच्या माध्यमातून दर मिनिटाला लाखो डॉलरचे व्यवहार होतात.

CamScanner